४

# बी. एड. स्तरावरील शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या समस्या निरसनासाठी मराठी आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या अनुदेशन साहित्याचे विकसन

**सौ. सुनिता आत्माराम लोंढे**
सहाय्यक प्राध्यापक, सेकेंडरी ट्रेनिंग कॉलेज, (मुंबई)

**डॉ. सुनिता मगरे**
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ

**प्रस्तावना**

आशययुक्त अध्यापन हा शिक्षक प्रशिक्षण क्षेत्रात नव्याने रुजत असलेला विचार आहे. अलीकडेच ही नवकल्पना विकसित होत असल्यामुळे या संकल्पनेवर विचारमंथन चालू आहे. पूर्वी शिक्षक हा शिक्षणप्रक्रियेचा केंद्रबिंदू होता. पण आधुनिक काळात विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. सर्व शिक्षणयंत्रणा विद्यार्थ्यांभोवती फिरत आहे. विद्यार्थीकेंद्री शिक्षण पध्दतीच्या अनुषंगाने शिक्षण शास्त्र अभ्यासक्रमातही बदल घडून येऊ लागले. अध्यापनशास्त्र हे आज गतिमानशास्त्र असल्यामुळे आशय व पध्दती या दोन्हींचाही विचार केला जाऊ लागला आहे. अगदी सुरुवातीच्या काळात फक्त पध्दतींना महत्व होते. प्रशिक्षण महाविद्यालयातही पध्दतीलाच जास्त महत्व देऊन त्याचे मूल्यमापन गुणात्मक दृष्ट्या केले जाऊ लागले. परंतु यातून एवादा सुवर्णमध्य साधला जावा असा विचार पुढे आला. 'शिक्षक-प्रशिक्षण अभ्यासक्रम - एक चौकट' ह्या अहवालाची निर्मिती १९७६-७८ या कालखंडात एन.सी.टी.ई. आणि यु.जी.सी. यांनी घडवून आणलेल्या विचारमंथनातून आली. या चौकटीत शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रमाचे जे तीन प्रमुख घटक मांडले गेले त्यातील 'आशययुक्त अध्यापन पद्धती' हा सर्वात महत्त्वाचा घटक मानण्यात आला. 'आशययुक्त अध्यापन पद्धती' म्हणजे आशययुक्त अध्यापनात प्रशिक्षणार्थींना नवीन आशय किंवा उच्च पातळीवर आशय अन्य कोणी शिकवणे अभिप्रेत नसून प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी अध्यापनासंदर्भात आशयावर करावयाच्या विचार प्रक्रियेस अधिक महत्व असल्याचे एन.सी.टी.ई. च्या मूळ कल्पनेत स्पष्ट केले. आशययुक्त अध्यापन पद्धतीची केवळ सैध्दांतिक माहिती असणारा प्रत्येक शिक्षक त्याचा वापर परिणामकारकतेने करू शकेलच असे नाही. त्याला प्रत्येक अध्यापन घटकाकडे चिकित्सक तसेच विद्यार्थ्यांच्या दृष्टीने पाहता आले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या विचार प्रक्रियेचा अंदाज घेता आला पाहिजे आणि ते प्रत्येक प्रशिक्षकाने साध्य करण्याचा प्रयत्न केल्यास आशययुक्त अध्यापनपद्धतीमुळे अध्यापनाची परिणामकारकता वाढण्यास मदत होईल. बी.एड. शिक्षणक्रमाचा प्रात्यक्षिक भाग हा सैध्दांतिक भागाइतकाच महत्वाचा. तो व्यवसायिक शिक्षणक्रम असल्याने ४० भारांश प्रात्यक्षिकावर दिलेला असतो. हे प्रात्यक्षिक कार्य अधिकाधिक अचूक व परिणामकारक होण्यासाठी प्रशिक्षणार्थींना काही पूरक साहित्याची गरज असते. प्रात्यक्षिक कार्यात येणाऱ्या अडचणी दूर होऊन आशययुक्त अध्यापन पद्धतीत अधिक सुलभता येण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बी.एड. प्रशिक्षणार्थींकरता मराठी आशययुक्त अध्यापनासाठी साहित्यनिर्मितीची मदत व मार्गदर्शन मिळेल असा विश्वास संशोधिकेस वाटतो.

**संशोधनाची अभ्यासाची गरज**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने, शिक्षणशास्त्र पदवी अंतर्गत आशययुक्त अध्यापन पध्दतीचा अंतर्भाव अलिकडेच २००३-०५ या तुकडीपासून केला आहे. यासाठी सर्व केंद्रावरील संमत्रकांसाठी विद्यापीठाच्या वतीने उद्‌बोधन वर्गाचे आयोजनही करण्यात आले होते. या उद्‌बोधन वर्गास संशोधिकेने उपस्थित राहून त्याची कार्यपध्दती जाणून घेतली. या नंतरही आशययुक्त अध्यापना संदर्भातील विद्यापीठाच्या पुढील प्रगत, सुधारणात्मक कार्याचा लाभही वेळोवेळी उद्‌बोधन वर्गास उपस्थित राहून घेतला. या वर्गांद्वारे प्राप्त माहितीनुसार त्याची कार्यवाही प्रत्येक तुकडीवर करण्यात येऊ लागली. या दरम्यान प्रशिक्षणार्थींना आशययुक्त अध्यापन पध्दतीचे प्रात्यक्षिक कार्य करीत असतांना, विशेषत: मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना अनेक समस्या जाणवू लागल्या. संमत्रक, समन्वयक या नात्याने गटकार्या दरम्यान या सर्व समस्यांचे बारकाईने निरिक्षण केले. त्यातून पुढील समस्या प्रकर्षाने जाणवल्या.

१) आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या संकल्पनेची आणि तिच्या पायऱ्यांची स्पष्टता नसणे.

२) विद्याशाखेनुसार संरचनेचे स्वरुप न समजणे.

३) अभ्यासक्रम-पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तक यांची योग्यरित्या चिकित्सा करता न येणे.

४) आशय विश्लेषणाच्या विविध पध्दतींमध्ये गोंधळ निर्माण होणे.

५) एक संबोध वेगवेगळ्या स्तरानुसार शिकविताना संबोधानुसार सामान्यिकरण करणे कठीण जाणे.

६) अध्यापन शास्त्रीय विश्लेषणात अचूकता नसणे.

७) आशययुक्त अध्यापन पध्दतीनुसार योग्य प्रतिरुपाची निवड करून त्याच्या वापराबाबात निश्चितता नसणे.

८) आशययुक्त अध्यापन पध्दतीनुरुप प्रपत्रे तयार करण्याच्या कामी क्लिष्टता निर्माण होणे.

९) विद्यापीठाने आशययुक्त अध्यापन पध्दतीचा लिखित पाठ-टाचण नमुना न दिल्याने पाठ-टाचण काढण्याच्या कामी अडचणी निर्माण होणे.

१०) पाठ-टाचणातील निरीक्षण नोंदीत आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या मुद्यांना प्राधान्य न दिल्याने आशययुक्त अध्यापन पध्दतीनुरुप अपेक्षित निरीक्षण न होणे

११) दिग्दर्शन पाठा अभावी आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या सैध्दांतिक भागाची प्रत्यक्ष पाठाशी सांगड घालता न येणे

१२) आशययुक्त अध्यापन पध्दतीचे 'अ' आणि 'आ' श्रेणीद्वारे पाठ निरीक्षण करणे कष्टदायी होणे.

१३) कार्यपुस्तिका २ मराठीचे प्रात्यक्षिक कार्य करताना संभ्रमता राहणे.

या समस्यांकडे केवळ समस्या म्हणून न पाहता त्या दूर करण्याच्या हेतूने काही ठोस उपाय करावेत या उद्देशातूनच या संशोधनाची गरज भासली.



Vol: 3rd , Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June 2014,ISSN : 2319-5525

**समस्येचे शीर्षक**

''बी.एड. स्तरावरील शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या समस्या निरसनासाठी मराठी आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या अनुदेशन साहित्याचे विकसन.''

**चलांच्या कार्यकारी व्याख्या**

१. **बी.एड. स्तर** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने सेवांतर्गत पदवीधर शिक्षकांसाठी दूरशिक्षणाद्वारे आयोजित शिक्षणशास्त्र पदवी शिक्षणक्रम

२. **मराठी विषय** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने बी.एड. प्रशिक्षणार्थींसाठी ठरवून दिलेल्या दहा अध्यापन पध्दतीपैंकी एक अध्यापन पध्दती.

३. **आशय युक्त अध्यापन पध्दती** : निरीक्षणक्षम कौशल्यांच्या परिभाषेत छात्र अध्यापकांमध्ये विकसित झालेले आशय आणि पध्दती ह्यांचे अर्थपूर्ण एकात्मीकरण होय.

४. **समस्या निरसन** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने बी.एड. अभ्यासक्रमासाठी निर्धारीत केलेल्या प्रात्यक्षिक कार्यापैकी आशययुक्त अध्यापनपध्दती मराठीच्या प्रशिक्षणार्थींना आशययुक्त अध्यापन पध्दतीनुसार पाठटा चण काढताना, प्रत्यक्ष पाठ घेताना निरीक्षण नोंदी घेण्याबाबत, तसेच त्याच्या प्रात्यक्षिक कार्यपुस्तीका भरताना येणाऱ्या अडचणींचे निवारण करणे.

५. **प्रक्षिणार्थी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील बी.एड. शिक्षणक्रमाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी.

६. **अनुदेशन साहित्य** : बी.एड. प्रशिक्षणांतर्गत आशययुक्त अध्यापन पध्दती मराठीच्या प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिक कार्य सुकर होण्यासाठी संशोधकाकडून विकसित केलेले छापिल, ध्वनिचित्रफित (सी.डी.) स्वरुपातील साहित्य. सदर संशोधनातील निर्मित अनुदेशन साहित्यात खालील घटकांचा समावेश केलेला आहे.

**छापील साहित्य -**

१) आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या पायऱ्यांचे निर्देशन करणारा आणि त्यानुरुप निरीक्षण नोंदीत केलेले बदल असा स्वनिर्मित मराठी विषयाचा पाठ-टाचण नमुना

२) 'अ' श्रेणी आणि 'आ' श्रेणी या दोन स्वतंत्ररित्या असलेल्या आशययुक्त अध्यापन पध्दती पाठासाठीच्या निरीक्षण श्रेणींचे संकलित एकल स्वरूपात केलेले रुपांतरण ध्वनिचित्रफित (सी.डी.)

३) आशययुक्त अध्यापन पध्दतीची संकल्पना आणि तिच्या आठ पायऱ्यांचे सविस्तर, सोदाहरण माहिती सादर करणारा प्रश्नोत्तर स्वरूपातील मुलाखतीचा नमुना

४) आशययुक्त अध्यापन पध्दती नुसार शारदाश्रम विद्यामंदिर दादर - मुंबई या शाळेतील इयत्ता ९ वी अ च्या वर्गावर 'पैल तोगे काऊ कोकताहे' ह्या मराठी पद्य घटकावर आधारित पाठ सादरीकरणाचा नमुना



Vol: 3rd , Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June 2014,ISSN : 2319-5525

**संशोधन अभ्यासाचे ध्येय**

बी.एड. स्तरावरील शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या समस्या निरसनासाठी मराठी आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या अनुदेशन साहित्याचे विकसन करणे आणि त्याची परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) मराठी विषयाच्या आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या अध्यापनात बी.एड. प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

२) मराठी विषयाच्या आशययुक्त अध्यापन पध्दतीत बी.एड. प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या समस्या निरसनासाठी अनुदेशन साहित्याची निर्मिती करणे.

**संशोधनाच्या परिकल्पना**

परिकल्पना १

विविध जिल्हयातील सर्व बी.एड. अभ्यासकेंद्रावरील निर्मित अनुदेशन साहित्याद्वारे केलेल्या आशययुक्त अध्यापन पध्दती मराठीच्या अध्यापनाच्या पूर्वचाचणी आणि उत्तर चाचणीच्या प्राप्तांकांत कोणताही लक्षणीय फरक नाही.

परिकल्पना २

बी.एड. च्या एकूण नमूना गटावर तसेच विविध जिल्हयातील प्रत्येक अभ्यास केंद्रावरील निर्मित अनुदेशन साहित्याद्वारे केलेल्या आशययुक्त अध्यापन पध्दती मराठीच्या अध्यापनाच्या पूर्वचाचणी आणि उत्तर चाचणीच्या प्राप्तांकांत कोणताही लक्षणीय फरक नाही.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केला आहे. प्रयोगिक पध्दती ही एक वैज्ञानिक पध्दती असून तिचे वैशिष्ट्य प्रयोग हे आहे. प्रयोगिक पध्दतीच्या प्रायोगिक अभिकल्पाच्या एकल गट अभिकल्पाद्वारे संशोधन कार्य करण्यात आले.

प्रायोगिक उपायांचा उपक्रम:- पूर्व कसोटी - प्रायोगिक उपाय - उत्तर कसोटी

**संशोधनाचा न्यादर्श**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध बी.एड. केंद्रापैकी १) शासकीय अध्यापक महाविद्यालय (रत्नागिरी) २) सेकेंडरी ट्रेनिंग कॉलेज, (मुंबई) ३) चेंबूर सर्वकष महाविद्यालय, (मुंबई) ४) सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन, उल्हासनगर (ठाणे जिल्हा) ५) शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल (रायगड) या केंद्रावरील प्रथम आणि द्वितीय अध्यापन पध्दती मराठीच्या सर्व प्रशिक्षणार्थींची सहेतुक पध्दतीने नमुना निवड केली. एकूण १ ३ ३

**माहिती मिळवण्याची साधने व तंत्रे**

निर्मित अनुदेशन साहित्य, पूर्वचाचणी कसोटी आणि उत्तर चाचणी कसोटी ही साधने आणि केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे, विचलन परिमाणे व 'टी' परिक्षिका तंत्राचा वापर केला.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

**व्याप्ती**

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार तयार केलेल्या आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाची चिकित्सा.

२. महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व बी.एड. प्रशिक्षण केंद्रावरील मराठी अध्यापन पध्दतीच्या प्रशिक्षणार्थींना आशययुक्त अध्यापन पध्दती संदर्भातील प्रात्यक्षिक कार्यात सुलभता निर्माण होण्या हेतू साहित्य निर्मिती अशी या क्षेत्राची व्याप्ती आहे.

३. मराठी प्रमुख आणि द्वितीय अध्यापन पध्दतीचे प्रशिक्षणार्थी.

**मर्यादा**

१. प्रस्तुत संशोधनासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, बी.एड. प्रशिक्षण कार्यक्रमासाठीच्या ३३ केंद्रापैकी १) शासकीय अध्यापक महाविद्यालय, (रत्नागिरी), २) सेकेंडरी ट्रेनिंग कॉलेज,(मुंबई), ३) चेंबूर सर्वंकष महाविद्यालय, चेंबूर, (मुंबई) ४) शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल (रायगड), ५) सेवासदन कॉलेज ऑफ एज्युकेशन, उल्हासनगर (ठाणे) या केंद्रावरील प्रथम व द्वितीय अध्यापन पध्दती मराठी असलेल्या प्रशिक्षणार्थींच विचारात घेण्यात आले.

२. बी.एड. अभ्यासक्रमातील मराठी आशययुक्त पध्दती असलेल्या विद्यार्थ्यांचाच विचार करण्यात आला.

३. आशययुक्त अध्यापन पध्दती मराठीच्या प्रात्यक्षिक कार्यपुस्तिका १ आणि कार्यपुस्तिका २ चे प्रात्यक्षिक कार्य व पाठाच्या सादरीकरणापुरते संशोधन कार्य मर्यादित होते.

४. साधन निर्मितीमध्ये केवळ विद्यापीठासाठी छापील साहित्य आणि ध्वनिचित्रफीत -सीडी स्वरुपातील साहित्य तयार करण्यात आले.

**संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष**

१. सर्व पाचही अभ्यासकेंद्रावरील प्रशिक्षणार्थींच्या संपादनात लक्षणीय फरक आढळला. २. प्रायोगिक गटाच्या पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणीच्या मध्यमान प्राप्तांकात लक्षणीय फरक आढळला. ३. संशोधकाने तयार केलेल्या अनुदेशन साहित्याद्वारे प्रशिक्षणार्थींना आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या संकल्पनेचे आकलन झाले. ४. प्रशिक्षणार्थींच्या मते आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या पायऱ्या सी.डी. च्या माध्यमातून योग्यरित्या स्पष्ट झाल्या. ५. प्रशिक्षणार्थींच्या पाठ-टाचण विषयक शंकांचे निरसन

होऊन पाठ कसा काढावा याची पुरेशी कल्पना आली. ६. आशययुक्त अध्यापन पध्दतीनुसार मराठीचा पाठ घेण्यास प्रशिक्षणार्थी मध्ये आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले. ७. प्रशिक्षणार्तीमध्ये आशययुक्त अध्यापना पध्दतीच्या महत्त्वाबाबत जागरुकता आली.८. प्रशिक्षणार्थींना पारंपारिक अध्यापन पध्दती आणि आशययुक्त अध्यापन पध्दती मधील फरक कळला. ९. ज्या प्रशिक्षणार्थींची मराठी ही द्वितीय अध्यापन पध्दती आहे अशा प्रशिक्षणार्थींना आशययुक्त अध्यापन पध्दतीनुसार कार्यपुस्तिका २ च्या कार्यपूर्तीसाठी अनुदेशन साहित्य हे मार्गदर्शक ठरले. १०. नेहमीच्या अध्यापनासाठी सुध्दा आशययुक्त अध्यापन पध्दतीचा एक अध्यापन तंत्र म्हणून वापर होऊ शकतो हे सिध्द झाले.११. आशययुक्त अध्यापन पध्दती मराठीचे अनुदेशन साहित्य हे अत्यंत प्रभावी असल्याचे प्रयोगांती सिध्द झाले.१२. आशययुक्त अध्यापन पध्दती मराठीच्या अनुदेशन साहित्याद्वारे स्वयं अध्ययन करण्यास प्रशिक्षणार्थी इच्छुक असल्याचे आढळून आले.१३. आशययुक्त अध्यापन पध्दती मराठीच्या अनुदेशन साहित्याच्या वापराने प्रशिक्षणार्थीमध्ये अभिरुची निर्माण झाली.१४. आशययुक्त अध्यापन पध्दती संबंधित सर्व मुद्दे स्पष्ट करण्यासाठी सी.डी. मध्ये उचित पध्दतीचा वापर केल्याचे प्रशिक्षणार्थींने मत मांडले. १५. सी.डी. मधील मुलाखतीद्वारे आशययुक्त अध्यापन पध्दती संदर्भातील दिले गेलल्या स्पष्टीकरणाने विद्यार्थ्यांचे समाधान झाले. १६. प्रशिक्षणार्थींना या संशोधनाद्वारे आशययुक्त अध्यापन पध्दती मराठीचा लिखित स्वरूपातील नमुना पाठ प्राप्त झाला.१७. आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या पाठ निरीक्षणासाठीची सुधारित निरीक्षण श्रेणी प्राप्त झाली.

**संशोधनाचे महत्त्व**

शदर संशोधनातून मिळणाऱ्या निष्कर्षाचा फायदा हा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बी.एड. करणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थींना तर होईलच पण त्याचबरोबर ज्या विद्यापीठात बी.एड. अभ्यासक्रमात आशययुक्त अध्यापन पध्दतीचा समावेश केला आहे अशा विद्यापीठातील बी.एड. प्रशिक्षणार्थीसांठीसुध्दा उपयुक्त ठरेल. सदर संशोधन कार्यासाठी वापरण्यात आलेल्या अनुदेशन साहित्याचा वापर जर विद्यापीठाने केला तर आशययुक्त अध्यापन पध्दतीची संकल्पना, तिच्या पायऱ्या, पाठाचे टाचण, पाठाचे सादरीकरण आणि पाठ निरीक्षण या बाबत असलेल्या प्रशिक्षणार्थींच्या शंकाचे निरसन होण्यास मदतच होईल. स्वयं अध्ययनाद्वारे आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या समग्र भागाचे आकलन होण्यास मदत होईल. संशोधनात आलेल्या निष्कर्षाचे सर्व अभ्यासकेंद्राला देखील निश्चितच लाभ होईल. अभ्यासकेंद्रावरील प्रशिक्षणार्थींचे प्रात्यक्षिक कार्यपूर्ती करण्याच्या कामी तसेच सैध्दांतिक भागातील अभ्यासक्रम '४' मधील 'मराठी' विषयाचे आकलन होण्याच्या दृष्टीने सदर संशोधन हे मार्गदर्शक ठरेल. प्रशिक्षणार्थी प्रात्यक्षिक कार्यपुस्तिकेचे लेखन कार्य १.१ ते पाठटाचणापर्यंत पूर्ण करून आशययुक्त अध्यापन पध्दतीनुसार प्रत्यक्ष पाठ घेतात तेंव्हा असे दिसून आले की, सर्व लेखन कार्य हे लेखनापुरतेच राहते ते प्रत्यक्ष पाठात उतरलेले दिसत नाही, कारण ज्या आशययुक्त अध्यापन पध्दती मराठी आणि मूलभूत (आशययुक्त अध्यापन पध्दती) या पुस्तकांच्या आधारे प्रशिक्षणार्थी माहिती

प्राप्त करतात, त्या पुस्तकामध्ये आशययुक्त अध्यापन पध्दतीने पाठ कसा घेतला जावा याचे पाठ नियोजन नाही व त्या संदर्भातील दृकश्राव्य स्वरुपातील दिग्दर्शन पाठाचा नमुनाही नाही. तसेच संमत्रकाद्वारे या पध्दतीने केंद्रावर दिग्दर्शन पाठ घेतले जावेत अशी योजनाही विद्यापीठाच्या वेळापत्रकात नसल्याने, संमत्रकांकडून याचे दिग्दर्शन पाठ न घेतल्याने प्रत्यक्ष पाठ घेताना प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या समस्या संशोधनाद्वारे दूर करणे महत्वाचे आहे. प्रात्यक्षिक कार्यपूर्ती करताना येणाऱ्या समस्या विद्यापीठाच्या निदर्शनासही आणून दिल्या, येणाऱ्या सुधारणात्मक सूचनांचा विद्यापीठाने स्वीकारही केला पण केवळ विद्यापीठ बदल घडवून आणेल तेव्हा पाहू असा दृष्टीकोन न ठेवता आपणच या उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निरसन करावे या विचारातून कार्य करणे महत्वाचे आहे. वरील उल्लेखित मुद्यांनुसार संशोधनाची गरज लक्षात घेता, या संशोधन कार्यामुळे सर्व ३५ केंद्रावरील आशययुक्त अध्यापन पध्दती मराठी विषय घेऊन बी.एड. करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आशययुक्त अध्यापन पध्दती प्रात्यक्षिक कार्यातील अडचणी दूर होऊन, विद्यापीठास अपेक्षित असणारी आशययुक्त अध्यापन पध्दतीची परिणामकारकता वाढण्यास मदतच होईल.

**संदर्भ सूची**

करंदीकर सुरेश, मंगळुरकर मीना (२००६), मराठी आशय अध्यापन पध्दती, कोल्हापूर, फडके प्रकाशन, चौथी आवृत्ती.

जोशी अनंत (१९९९), आशययुक्त अध्यापन पध्दती, नाशिक, य.च.म.मु. विद्यापीठ, प्रथम आवृत्ती.

जोशी अनंत (२००३), दूरशिक्षणाद्वारे शिक्षक प्रशिक्षण, नाशिक य.च.म.मुक्तविद्यापीठ, प्रथम आवृत्ती.

जोशी अनंत (१९९९), मुक्त विद्यापीठ संशोधन पुष्प क्र. १ नाशिक.

महाले संजिवनी, य.च.म.मुक्तविद्यापीठ, प्रथम आवृत्ती.

दुनाखे अरविंद (२००५), मराठीचे आशययुक्त अध्यापन, पुणे, नित्यनूतन प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

पारसनीस न.रा. (१९९३), शिक्षकाचे प्रशिक्षण, पुणे, नुतन प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

पवार ना.ग. (२००५), मातृभाषामराठीचे आशययुक्त अध्यापन पुणे, नूतन प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

भिताडे विनायक जगताप (१९९५), आशययुक्त अध्यापन पध्दती, सोलापूर, ह.ना. बोंदार्डे कैलास प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

साळुंखे कविता (२००३), आशययुक्त अध्यापन पध्दती (मूलभूत) नाशिक, य.च.म.मुक्तविद्यापीठ, प्रथम आवृत्ती.

मुळे रा.श. उमाठे वि.तु. (१९८७), शैक्षणिक संशोधनासाठी मुलतत्वे नागपूर, महाराष्ट्र साहित्य निर्मिती मंडळ.

पण्डित बन्सी बिहारी (१९९७), शिक्षणातील संशोधन पुणे, नूतन प्रकाशन प्रथम आवृत्ती.

साळुंखे कविता (२००३), आशययुक्त अध्यापन पध्दती, प्रात्यक्षिक कार्यपुस्तिका भाग २, नाशिक, य.च.म.मुक्तविद्यापीठ, पुर्नमुद्रण

सोहोनी शं.कृ. (१९९३), शैक्षणिक टीपा कोश, पुणे, सी.सुधा सोहोनी प्रकाशन पहिली आवृत्ती.

...